
Impact Factor 5.057

ISSN No. 2454-8731 MONTHLY PEER REVIEWED JOURNAL

# Rankranti Multidisciplinary Research Journal




*Chief Editor*
**Dr. Umesh B. Pujari**

*Executive Editor*
**Dr.. Amit H. Raut**

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**Vol.8, Issue : II, Feb. 2022**

Chaitanya Prakashan, Nanded - 431606

9763308333, 9011107939,

email – rmrjournal@gmail.com

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

# Rankranti Multidisciplinary Research Journal

Rankranti Multidisciplinary
Research Journal
ISSN No. 2454-8731

*Chief Editor*
**Dr. Umesh B. Pujari**

*Executive Editor*
**Dr.. Amit H. Raut**

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

| अ.क्र. | संशोधन विषय | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | महात्मा फुले यांचे दलितांच्या उध्दाराचे कार्य | प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे | 01 - 04 |
| 2 | महाराष्ट्राच्या लोकप्रशासनात यशदाचे योगदान | डॉ. बबन जोगदंडे<br>डॉ. बालाजी कत्तुरवार | 05 - 09 |
| 3 | भारतीय महिलांचा एकात्मिक प्रवास | प्रा.गजानन रा. जाधव | 10 - 16 |
| 4 | The Economic Theory and Thought of Adam Smith | Dr. Shankar Sawargaonkar | 17 - 20 |
| 5 | राष्ट्रीय सेवा योजना – एक युवा चळवळ | प्रा. डॉ. रंजीता डी.जाधव | 21 - 26 |
| 6 | A multisensory approach to teach basic mathematics skills to primary children with learning disorder. | Ms. Taruna Samnotra<br>Dr Anil.B.Wagh | 26 - 37 |
| 7 | INTERVIEWS IN QUANTITATIVE AND QUALITATIVE RESEARCH | Dr. Chandu Popatkar | 38 - 45 |
| 8 | ऊसतोड महिला कामगारांचे सक्षमीकरण | प्रा. महादेव चैतराम चुंचे | 46 - 51 |
| 9 | A Study of Youth Problems among Male and Female College Going Students | Dr. Amit Raut | 52 - 58 |
| 10 | रंगो व्दारा राग–चित्रों में रसाभिव्यक्ति | प्रा. डॉ. प्राची हलगांवकर | 59 - 64 |
| 11 | सुरेश भट आणि त्यांची गझल | प्रा. डॉ. पुरूषोत्तम जुन्ने | 65 - 70 |
| 12 | मनुष्य जीवन में संगीत का योगदान | प्रा. डॉ. सुशील वावरकर | 71 - 77 |


वरील संशोधन पत्रिकेतील सर्व लेखन किंवा मतांशी प्रकाशक, मुद्रक, संपादक, संपादक समिती सदस्य आणि प्रकाशनांच्या सर्व समितीचे सर्व सदस्य सहमत असतील असे नाही. वरील संशोधन लेखाची जबाबदारी ही त्या - त्या लेखकांची असेल. जर कुणाला प्रकाशनाची काही हरकत असेल तर त्यांची न्यायालयीन कार्यक्षेत्र नांदेड असेल.

# महात्मा फुले यांचे दलितांच्या उध्दाराचे कार्य

प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे
मराठी विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना**

महात्मा जोतिबा फुले हे १९ व्या शतकातील पहिले सामाजिक इतिहासकार, इतिहास संशोधक, इतिहास लेखक, विश्लेषक, सामाजिक मानववंशशास्त्राचा पाया रचणारे संशोधक, पहिले शिवशाहीर, आद्य नाटककार, कठोर धर्मचिकित्सक, मानवतावादी धर्मसंस्थापक असे त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व व कार्य आहे. विज्ञानवाद, बुध्दिप्रामाण्यवाद, स्त्री–पुरुष समतेचे पुरस्कर्ते होते.

महात्मा फुले यांचे योगदान महाराष्ट्राच्या जडण–घडणीत अतिशय महत्त्वाचे आहे. म्हणून महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्राच्या मुलगामी समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक ठरतात. फुलेंनी मरगळलेल्या आणि आत्मभान हरवलेल्या समाजाला नवविचारांची संजीवनी दिली. वर्षानुवर्ष गुलामीमध्ये खितपत पडलेल्यांना स्वत्व प्राप्त करून दिले. हजारो वर्षांपासून अज्ञान आणि अंधश्रद्धेमध्ये होरपळणाऱ्यांना ज्ञानाचा आणि शिक्षणाचा मुलमंत्र दिला. म्हणून खऱ्या अर्थाने महात्मा फुले यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचा पाया रोवला. महात्मा फुले हे केवळ शाब्दिक खेळ खेळणारे बोलके विचारवंत नाही तर विचाराला स्वतःच्या आचाराची व कृतीची जोड देणारे एक सक्रीय कृतीशील विचारवंत होते. म्हणून महाराष्ट्राच्या नवनिर्मितीमध्ये दिलेले योगदान अतिशय अनमोल आहे.

महात्मा फुले यांच्या काळातील सामाजिक परिस्थिती ही अतिशय विदारक होती. भारतीय समाजाची रचनाच ही मुळात विषमतेवर आधारित असल्यामुळे या समाजव्यवस्थेत व्यक्तीला असमान दर्जा प्राप्त झालेला होता. व्यक्तीच्या कर्माऐवजी व्यक्तिची जात महत्त्वाची मानली जात असल्यामुळे माणसाचा दर्जा जातीवरच निर्धारीत होत होता. या जातीव्यवस्थेने व वर्णव्यवस्थेने माणसा–माणसात विषमता आणि उच्च–निच्च भेद निर्माण केले. त्यामुळे मानवी नीतिमूल्ये पायदळी तुडवली जाऊ लागली. त्यामुळे महात्मा फुले यांची वर्णव्यवस्थेवरच प्रहार केले. त्यांच्या मते, ष्वर्णव्यवस्था ही अन्यायकारक आणि पक्षपाती आहे. कारण वर्णव्यवस्था ही मानवनिर्मित आहे.[१] उच्च वर्णीयांनी स्वतःचे वर्चस्व समाजात प्रस्थापित करण्यासाठी ही वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था निर्माण केली व तीचे संगोपन करीत आहेत. या जातीव्यवस्थेने

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

माणसा–माणसात दरी निर्माण केली. त्यामुळे जोपर्यंत जातीव्यवस्थेचे मुळातून उच्चाटन होणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने सामाजिक समता प्रस्थापित होणार नाही. महात्मा फुले यांच्या मते, ष्माणसे जातीचे प्रमाणपत्रे जवळ बाळगून मोठे होणार नाहीत. तर ती कर्तव्याने व स्पकष्टाने मोठी होतात. ष्महात्मा फुले यांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी शतकानुशतके उच्चवर्णीयांनी अस्पृश्य मानलेल्या समाजातील पद्दलित जनतेच्या उध्दाराचे व्रत्त अंगीकारले. जातीयतेच्या परंपरागत बंधनांनी जखडलेल्या अस्पृश्य समाजाला शिक्षणाव्दारे जागृत करण्याचे कार्य केले. १८५२ ते १८५८ पर्यंत अस्पृश्य मुलांसाठी तीन शाळा उघडल्या आपल्या मित्रांच्या सहकार्याने व दक्षिण प्राईज फंडातून अर्थसहाय्य मिळाले. १२ वर्षाखालील मुलामुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण द्यावे अशी मागणी केली. शुद्रातिशुद्रांकडून अन्यायाने घेतलेल्या करातून वाई, बनारस, प्रयाग व नाशिक येथे राम कृष्णाची मंदिरे बांधण्यासाठी खर्च केला जाणारा पैसा अज्ञानी शुद्रातिशुद्रांच्या मुलांना सुशिक्षण देण्यासाठी, शाळा बांधण्याच्या कामी खर्च करावे असे महात्मा फुलेंनी म्हटले आहे.

महात्मा फुले यांनी अस्पृश्यांच्या निवारणासाठी जे–जे कार्य केले त्यापैकी एक अस्पृश्यता निवारण होय. भारतात ४२९ अस्पृश्य जाती होत्या. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या यांचा दर्जा समाजव्यवस्थेत अत्यंत खालचा होता. अनेक समाज सुधारकांनी उच्चवर्णीय लोकांकडून अस्पृश्यतेच्या नावाखाली अस्पृश्यावर होणाऱ्या अन्यायावर आणि त्यांना दिल्या जाणाऱ्या अपमानास्पद वागणुकीवर टिकेचे प्रहार केले. परंतु महात्मा फुले आपले कार्य कृतीत आणत असत. अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठयावर पाणी भरण्याची मुभा नव्हती. अशावेळी त्यांनी आपल्या वाडयातील पाण्याने भरलेला होद इ.स १८६८ मध्ये अस्पृश्य लोकांना खुला केला. तसेच त्यांनी इ. स. १८७३ मध्ये अस्पृश्यता निवारणाचा जाहिरनामा काढला. त्यामुळेच पुढे भारत सरकारला अस्पृश्यता ही कायद्याने नष्ट करता आली.

अस्पृश्यते प्रमाणेच समाजव्यवस्थेत गुलामगिरीची प्रथा रूढ होती. महात्मा फुले यांनी गुलामगिरी नष्ट करण्याचाही प्रयत्न केला. समाजात उच्चवर्णीय लोक खालच्या बहुजन समाजाला गुलामगिरीत वागवीत होते. महात्मा फुले यांनी लिहीलेल्या गुलामगिरी या ग्रंथात ते म्हणतात स्वतःच्या स्वार्थासाठी ब्राम्हण लोकांनी जातीव्यवस्था निर्माण केली आणि आपल्यासाठी सुखसोई व सवलती करून ठेवल्या. तसेच शुद्र आणि अतिशुद्र लोकांना गूलामगिरीच्या खाईत लोटून दिले. परंतु महात्मा फुलेनी ब्राम्हण लोकांचे हे सर्व ढोंग सर्वप्रथम चव्हाटयावर आणले आणि शुद्र व अतिशुद्रांची गूलामगिरी नष्ट करण्यासाठी त्यांना शिक्षण देऊन जागृत केले. परिणामी ते गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करू लागले. महात्मा फुले यांनी दलितांसाठी जशी पहिली

शाळा सुरू केली त्याचप्रमाणे त्यांनी दलितांसाठी पहिल्यांदा वाचनालय सुरु केले. यासाठी त्यांना पूणे येथील काही सुशिक्षीत लोकांनी सहकार्य केले. शिक्षण व वाचनामुळे मनुष्याच्या ज्ञानात भर पडते तसेच तो आत्मनिर्भर बनतो. याशिवाय मनुष्यात विचार करण्याची क्षमता निर्माण होते असे महात्मा फुलेंचे मत होते.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी १८५५ मध्ये रात्रीची शाळा सुरू केली. ही शाळा त्यांनी आपल्याच घरी चालविली. या शाळेत महात्मा फुले व सावित्रीबाई फुले दररोज दोन तास प्रोढ स्त्री पुरुषांना शिकवित असत. समाजातील प्रत्येकांना शिक्षण घेता यावे. हाच रात्रीची शाळा स्थापन करण्याचा महात्मा फुले यांचा दृष्टीकोण होता. याच दृष्टीकोणातून पूढे भारत सरकारने प्रोढ स्त्री पुरुषांना साक्षर करण्यासाठी प्रोढ शिक्षण पध्दतीचा अवलंब केला.

महात्मा फूले यांनी इ.स. १८४८ मध्ये जगन्नाथ सदाशिव हाटे व सदाशिव बल्लाळ गोवंडे यांच्या मदतीने पुणे येथे बुधवारपेठेत मराठा जातीच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा स्थापन केली. महात्मा फुले यांनी अत्यंत कठिण परिस्थितीत ही शाळा चालविली. या शाळेत वाचन, लेखन, अंकगणित, व्याकरण, इतिहास भूगोल, युरोप आशिया व हिंदुस्थानचे नकाशे, बाळबोध, मोडी अक्षर वळवणे आणि गणित इत्यादी विषयाचे शिक्षण दिले जात होते.

दलित वर्गावर पसरलेले दैववादाचे नैराश्याचे, औदासिन्याचे मूळ दूर करून त्याला आत्मावलोकनाचा आत्मोध्दाराचा मार्ग दाखवून स्वसामर्थ्याची यर्थाथ जाणिव करून देणारा उध्दारक म्हणून महात्मा ज्योतीराव फुले यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांच्या दलितोध्दारक कार्यात सनातनी कर्मठ लोकांनी सातत्याने आणलेल्या असंख्य अडचणीवर यशस्वी मात करून धैर्याने अस्पृश्यांच्या उध्दारांसाठी कार्य केले.

**निष्कर्ष**

महात्मा फुले यांनी समाजातील अस्पृश्यता निवारण करून सामाजिक समता व मानवता प्रस्थापित करण्याचे कार्य केले. समाज व्यवस्थेतून गुलामगिरी नष्ट करण्यासाठी दीन– दलितांसाठी शाळा सुरू केली. समाजप्रबोधन करून दलित वर्गातील दैववाद दूर करण्याचे कार्य त्यांनी केले.

**संदर्भसूची**


- डॉ. एस. एम. गाढाळ, आंबेडकरी चवळवळीचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
- संपादक पी.बी.साळुंखे, महात्मा फुले गौरव ग्रंथ, खंड पहिला, महाराष्ट्र राज्य प्रकाशन विभाग, मुंबई.
- भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा इतिहास – डॉ. अनिल कठारे


PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

- भारताचा इतिहास १९६१ ते १८५१ – धनंजय आचार्य
- महात्मा फुले समग्र वाङ्मय संपादक धनंजय कीर
- महात्मा फुले सामाजिक क्रांतीचे अग्रदूत दत्ता जी. कुलकर्णी
- युगपुरुष महात्मा

PRINCIPAL
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS)

PRINCIPAL
Shivaji College, HING